पाक्षिक
वार्षिक वर्गणी रु. ३०
किंमत १ रुपया २५ पैसे

# शेतकरी संघटक

वर्ष १० वे
अंक २३ वा
२१ मार्च १९९४

# मुख्यमंत्री गिनेस बुककोत

**- शरद जोशी**

जनसामान्यांची आठवण अधु असते, तिचा फायदा पुढारी लोक घेतात हे साहजिक आहे. पण हा फायदा घेण्याचाही उच्चांक, अगदी गिनेस बुकमध्ये नोंद व्हावी असा उच्चांक, महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी केला आहे.

### तीच कर्जे तिसऱ्यांदा माफ

७ मार्च १९९४ रोजी तुळजापूर येथील एका मेळाव्यात, शेतकऱ्यांनी सरकारकडून घेतलेली कर्जे माफ करण्यात येतील अशी घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली. जमीन सपाटीकरण, मृद्संधारण व पाटबंधाऱ्यांच्या कामांसाठी शेतकऱ्यांनी घेतलेली कर्जे घेतली केव्हां, मुदत किती, व्याज केवढे, थकबाकी किती, आणि त्यांचा बोजा आहे तरी केवढा? काही एक प्रश्न न विचारताच सगळ्या वर्तमानपत्रांत मुख्यमंत्र्यांची ही घोषणा अग्रभागी झळकली. कित्येक संपादकांनी 'चांगला निर्णय, पण सावधान' धर्तीचे अग्रलेख ठोकून दिले.

सरकारी कर्जे माफ झाल्याची घोषणा करत राहणे हा मुख्यमंत्र्यांचा लाडका छंद आहे. पाकिस्तानात राजकीय समस्या भेडसावू लागल्या की तेथील सरकारे काश्मीरचा प्रश्न उठवू लागतात, तसाच हा प्रकार. बुडाखालील खुर्ची डळमळू लागली की शेतकऱ्यांना सरकारी कर्जांची माफी जाहीर करायची. मुख्यमंत्र्यांचा हा छंद इतका लाडका की, त्यांनी या प्रकाराची केलेली ही तिसरी घोषणा आहे.

### पुलोद अवतारात कर्जमाफी

याच मतितार्थाची घोषणा पुलोदचे मुख्यमंत्री म्हणून शरद पवारांनी १ मे १९७९ रोजी असाच गाजावाजा करून महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने केली होती.

'अल्पभूधारक' अवर्षण टंचाईग्रस्त भागातील शेतकऱ्यांना शासनाने व्याजात सूट दिली. बंडींगचा लाभ न झालेल्यांचे कर्ज माफ केले... या सर्व उपाययोजनांमुळे गेल्या १० महिन्यांत शेतकऱ्यांसाठी १६८ कोटी रुपयांची सूटसवलत राज्यशासनाने जाहीर केली,' असे मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्र दिनानिमित्त दिलेल्या संदेशात म्हटले होते.

महाराष्ट्र शासनातर्फे १९७९ साली 'बंडींगची १२७ केटी रुपयाची कर्जे माफ' केल्याच्या जाहिराती देखील देण्यात आल्या होत्या.

या निर्णयाची अंमलबजावणी झाली नसावी; कारण २५ जानेवारी १९८० रोजी पुलोद मंत्रीमंडळाच्या अखेरच्या काळात त्या अर्थाचा एक स्थगन प्रस्ताव विधानसभेत मांडण्यात आला होता. ठराव सादर करण्याऱ्यांत शिवाजीराव देशमुख, प्रमोद शेंडे, रोहिदास पाटील, पु. म. डेकाटे, बळीराम हिरे इत्यादी शरद पवारांबरोबर आज घोटाळत असलेली मंडळीही होती.

> **एका एका प्रकल्पाचे पायाभरणी समारंभ १०-१० वेळा वेगवेगळ्या सन्माननीय नेत्यांच्या हस्ते झाल्याची उदाहरणे अनेक आहेत. मुख्यमंत्री सरकारी कर्जमाफीच्या प्रकल्पाच्या पायाभरणीचा समारंभ तिसऱ्यांदा करत आहेत. प्रकल्प पुरा होणार नाही याची त्यांनी काळजी घेतली पाहिजे, पुढच्या वेळी ते अडचणीत आले तर चवथ्या वेळी सरकारी कर्जाच्या माफीची घोषणा करायला वाव ठेवला पाहिजे.**

### मनोमिलन आणि पुन्हा कर्जमाफी

१९७९ साली गाजावाजा करून जाहीर केलेली थकबाकीची माफी पुलोद शासनास अंमलात आणता आली नाही. मध्यंतरी मुख्यमंत्र्यांना वनवास घडला; नंतर ते 'मनोमिलन' करून त्यांच्या संस्कृतीशी जुळणाऱ्या पक्षात परत गेले, पुन्हा मुख्यमंत्री बनले आणि ७ नोव्हेंबर १९८८ रोजी दिवाळीच्या शुभमुहूर्तावर त्यांनी २२० कोटी रुपयांची सरकारी कर्जांची सूट जाहीर केली. माफ झालेली कर्जे मुख्यतः बंडींगची व तगाई थकबाकीची अशी होती. ही कर्जे म्हणजे शासनातील वेगवेगळ्या खात्यांत दशकानुदशके साचत आलेल्या थकबाक्या होत्या; त्या वसूल होण्याची कणमात्र शक्यता नव्हती. बंडींगच्या कर्जाबाबत तर आपल्या खात्यावर सरकारने अशी काही कर्जे चढवली आहेत याची माहितीदेखील शेतकऱ्यांना नव्हती. शेतकरी संघटनेचे कर्जमुक्ती आंदोलन त्यावेळी गाजत होते, त्यावर मात करण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी ही चाल खेळली असे बहुतेक वृत्तपत्रातील अग्रलेखात टीपणीदाखल म्हटले होते.

### लालभाई शरद पवार

१९८८ सालच्या कर्जमाफीचे प्रकरण एवढ्यात मिटले नाही. त्यांच्या निर्णयावर पुष्कळ टीका झाली. आपला निर्णय अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या ठरावास धरून आहे असे समर्थन मुख्यमंत्र्यांनी केले. ''कोणाच्या टीकेची पर्वा न करतां कर्जमाफी अंमलात आणू;

शेतकऱ्यांचा ७/१२ चा उतारा कोरा करू'', अशा घोषणा केल्या. ''टाटा-बिर्ला मागास भागांत जातात, उद्योग काढतात, म्हणून त्यांना सरकार सवलती देते. जमीन, पाणी, वीज, सवलतीच्या दराने देते, विविध कर माफ करते. हे सगळ्यांना चालते आणि ग्रामीण भागात जो भूमिपुत्र गेली अनेक वर्षे राबतो आहे त्याला सवलती दिल्या तर लगेच या मंडळींची पोटे दुखतात. आम्हाला 'नेहरूंचा समाजवाद' आणायचा आहे, हे राज्य केवळ भांडवलदारांचे नाही. उद्योगपतींना जशा सवलती मिळतात तशाच शेतकऱ्यांनाही मिळाव्यात ही आमची भूमिका आहे,'' शरद पवारांनी त्यांच्या 'नेहरूवादी समाजवादी'' अवतारात घोषणा केली.

## पवार विरुद्ध मल्होत्रा

कर्जमाफीच्या या निर्णयावर १२ नोव्हेंबर १९८८ रोजी त्यावेळचे रिझर्व बँकेचे गव्हर्नर श्री. मल्होत्रा यांनी सणसणीत टीका केली. हरियानामध्ये थोड्या महिन्यांपूर्वी चौधरी देवीलाल यांनी कर्जमाफी केली होती. त्याहीवेळी मल्होत्रांनी अशीच भूमिका जाहीरपणे घेतली होती आणि तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनीही कर्जमाफीस विरोध केला होतो. 'विद्वानांची फिकीर न बाळगता आपण आपला निर्णय अंमलात आणू'' अशी ग्वाही शरद पवारांनी दिली, एवढेच नव्हे तर १८ नोव्हेंबर १९९२ रोजी आणखी १२० कोटी रुपयांची कर्जे माफ केल्याची घोषणा केली. सरकारी थकबाक्या आता निकालात निघाल्या असल्याची घोषणा केली.

३ डिसेंबर १९८८ रोजी लोकसभेत वित्तराज्यमंत्र्यांनी एक घोषणा केली; शेतकऱ्यांना दिलेली कर्जे माफ करण्याला सरकारचा तत्त्वतः विरोध असल्याचे त्यांनी जाहीर केले.

पवारांच्या मनावर केंद्र शासनाच्या भूमिकेचा काही परिणाम झाला नाही. ''कर्जमाफीच्या निर्णयाबद्दल अनेक जबाबदार व्यक्तींनी अतिशय प्रतिकूल अभिप्राय व्यक्त केले असले तरीही कर्जमाफी निर्णयापासून शासन तसूभरही मागे हटणार नाही'' अशी त्यांनी १२ डिसेंबर १९८८ रोजी सावनेर तालुक्यातील राजेगांव येथे डरकाळी फोडली.

## शरदचंद्रजी गरजले

गाजावाजा खूप झाला; पण अंमलबजावणी काही सुरू झाल्याचे लक्षण दिसेना. याउलट राष्ट्रीय कृषि व ग्रामीण विकास बँकेने शेतकऱ्यांचा पतपुरवठा थांबवला आणि कर्जमाफीच्या निर्णयाला आव्हान दिले. नाबार्डच्या भूमिकेवर मुख्यमंत्री तुटून पडले आणि मुंबई येथे इंदिरा काँग्रेसने आयोजित केलेल्या एका परिसंवादात, ९ जानेवारी ८९ रोजी रिझर्व बँक आणि नाबार्ड यांची भूमिका सरकारला मान्य नाही; केंद्रीय अर्थमंत्रालयानेही काँग्रेस समितीच्या 'औरंगाबाद ठरावांची दखल घ्यावी आणि नाबार्डची भूमिका खोडून काढावी', असे आवाहन केले.

सरकारी निवेदनांत जानेवारी ८९ मध्ये तगाई कर्जे व्याजासकट माफ झाल्याचे सांगण्यात आले.

१ एप्रिल १९८९ रोजी बारामतीत शेतकऱ्यांचा मेळावा भरला. पंतप्रधान राजीव गांधी हजर होते. त्यांच्यासमोर मुख्यमंत्र्यांनी रिझर्व बँक, नाबार्ड यांचा 'झारीतील शुक्राचार्य' म्हणून उल्लेख केला. ''या प्रश्नावर केंद्र सरकार विचार करीत आहे व यासंबंधी लवकरच निर्णय घेतला जाईल.'' असे पंतप्रधानांनी जाहीर केले. पण या घोषणेनंतर केंद्र शासनाने कर्जमाफीच्या निर्णयांची अंमलबजावणी व्हावी यासाठी हिरवा कंदील काही दाखवला नाही.

## फेकून देईन भिकार राजवस्त्रे

३१ मे १९८९ रोजी 'शेतकऱ्यांच्या कर्जमाफी प्रकरणी रिझर्व बँक आणि नाबार्ड यांचे आडमुठे धोरण चालू राहणार असेल तर आपण राजीनामा देऊ' अशी धमकी मुख्यमंत्र्यांनी नाशिक येथे जाहीर केली. आपल्या निर्णयांना पंतप्रधानांची संमति असल्याचेही त्यांनी सांगितले. राजीनाम्याची धमकी सगळ्या वर्तमानपत्रांत झळकली. त्यानंतर दोनच दिवसात म्हणजे २ जून ८९ रोजी मुख्यमंत्र्यांनी बँकींग व्यवस्थेविरुद्ध युद्ध पुकारले आणि आम जनतेने राष्ट्रीकृत बँकांतून आपल्या ठेवी काढून घ्याव्यात असे आवाहन केले.

## बालिश बहु, बायकात बडबडला

त्यानंतरच्या दोन दिवसात काय घडले असेल याचा अंदाज सहज घेता येईल. ५ जून रोजी दिल्लीत पत्रकारांशी बोलतांना, ''आपण राजीनाम्याची धमकी दिलेली नाही, या प्रकरणात मार्ग काढण्याचा प्रयत्न स्वतः पंतप्रधान करीत आहे, त्यांची भूमिका मला अनुकूल आढळली, राजीनाम्याची भाषा उच्चारून मी त्यांच्यासाठी अडचणी निर्माण करू इच्छित नाही,'' अशी 'बेंऽबेंऽ' केली. दिल्लीचा तिढा काही सुटेना, नाबार्डच्या नकारामुळे झालेली कोंडी कायम राहिली. शेवटी दिल्लीचा निर्णय झाला. ७ जूनच्या सर्व वर्तमानपत्रांत मथळे झळकले 'नाबार्डपुढे मुख्यमंत्र्यांचे अपयश', 'पवार रिकाम्या हाताने परतले.' ''केंद्र शासनाने शेती कर्जासंबंधी मुख्यमंत्र्यांचे प्रस्ताव फेटाळले.''

## भूखंडांनी लाज राखली

या सगळ्या गोंधळगर्दीत जूनच्या शेवटापर्यंत शेतकऱ्यांना पीककर्जेही मिळाली नाहीत. केंद्राकडून समज मिळाल्यानंतर मुख्यमंत्री घोड्यावरून उतरले आणि आपले उद्दिष्ट साध्य करण्याचे दोनतीन पर्याय तपासून पाहणार असल्याचे त्यांनी जाहीर केले. त्याचवेळी मुंबईतील २८५ भूखंडांच्या आरक्षणाचा प्रश्न उफाळून वर आला. सर्वसामान्य जनतेला कर्जमुक्ती प्रकरणापेक्षा भूखंड प्रकरण समजायला सोपे वाटते; तेव्हा सगळ्यांचे लक्ष तिकडे गेले; आणि कर्जमाफीचे प्रकरण विस्मृतीच्या पडद्याआड गेले.

## पुन्हा एकदा तीच कर्जमाफी

त्यानंतर तब्बल ५ वर्षांनी अशाच एका शेतकरी मेळाव्यात मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांची सरकारी कर्जे माफ करण्याची घोषणा केली आहे. आता ते 'नेहरू समाजवादी' अवतारात नाहीत. खुल्या व्यवस्थेचे प्रणेते म्हणून आपल्याला मानण्यात यावे अशी त्यांची धावपळ चालू आहे. तरीही पुन्हा एकदा कर्जमाफीची घोषणा त्यांनी केली आहे.

एका एका प्रकल्पाचे पायाभरणी समारंभ १०-१० वेळा वेगवेगळ्या सन्माननीय नेत्यांच्या हस्ते झाल्याची उदाहरणे अनेक आहेत. मुख्यमंत्री सरकारी कर्जमाफीच्या प्रकल्पाच्या पायाभरणीचा समारंभ तिसऱ्यांदा करत आहेत. प्रकल्प पुरा होणार नाही याची त्यांनी काळजी घेतली पाहिजे, पुढच्या वेळी ते अडचणीत आले तर चवथ्या वेळी सरकारी कर्जाच्या माफीची घोषणा करायला वाव ठेवला पाहिजे.

*ग्यानबा न्यूज सर्व्हिस*

# कापूस : निर्यातबंदीबाबत भिन्न मते

गेल्या सहा महिन्यांत कापसाबाबतचे सरकारी धोरण हे 'धरसोड' प्रवृत्ती स्पष्ट करते. कापूस हंगाम हा सप्टेंबर ते ऑगस्ट असा आहे. १९९३-९४ चा हंगाम एक सप्टेंबर १९९३ पासून सुरू झाला, तेव्हा सरकारने पाच लाख गासड्यांचा निर्यात कोटा, ९३-९४ हंगामासाठी जाहीर केला. वस्त्रोद्योग मंत्रालयाद्वारा हा 'कोटा' जाहीर झाला तेव्हा शेतकरी मंत्रालयाने, असा तुटक कोटा जाहीर करण्याऐवजी कापूसनिर्यात खुली करावी व कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे भले करावे, असा हट्ट धरला होता. याचबरोबर व्यापाऱ्यांकडे कापूसनिर्यात सोपवून भरपूर निर्यात शक्य आहे, असा दावा शेतकरी मंत्रालयाने केला. वस्त्रोद्योग खात्याने मात्र चार लाख गासड्या निर्यात ही केंद्र-राज्य सरकारनियंत्रित संस्थांना दिली व फक्त एक लाख गासड्या 'बेगॉल-देशी' जातीची निर्यात सर्वांना खुली ठेवली. १९९२-९३ मध्ये मंत्रालयाने १७.८५ लाख गासड्या निर्यात कोटा मंजूर केला होता व प्रत्यक्षात हंगामात १३.७ लाख गासड्यांची निर्यात झाली.

वस्त्रोद्योग मंत्रालयाने कापूस निर्यात कोटा पद्धत चालू ठेवताना, यामागे शेतकऱ्यांना योग्य भाव; पण हातमाग व कापड उद्योगास रास्त दराने कापूस मिळण्याची गरज स्पष्ट केली व कापसाचे भाव साधारणतः किमान भावाच्या २० टक्क्यांच्या वर ठेवणे इष्ट आहे; पण अधिक भाव अयोग्य आहेत, असे स्पष्ट केले. भारताची एकूण कापड-कपडे-सूत निर्यात, ही कापूस भाव बेताचे असण्यावर अवलंबून आहे, असेही स्पष्ट केले गेले याचबरोबर कापसापेक्षा सूत, त्यापेक्षा कापड व त्यापेक्षा कपड्यांची निर्यात भारताच्या दृष्टीने अधिक हिताची असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

शेतकी खात्याने, सूत व कापड क्षेत्रातील कमी उत्पादकता, जुने तंत्रज्ञान, इतर खर्चाचे खापर, कापूस स्वस्त ठेवून भरून काढणे, अयोग्य असल्याचे गाऱ्हाणे मांडले. कापूस उत्पादकांना फायदा मिळावा असे म्हटले. इंडियन कॉटन मिल्स फेडरेशनने स्वस्त कापसाचा फायदा देताना असे गणित मांडले, की एक लाख गासड्या कापूस निर्यात ६० कोटी रुपये मिळवून देईल. सूत बनविले तर ११९ कोटी रुपये देते, तर कपडे निर्यात ५०० कोटी रुपये देतील. बॉम्बे मिलओनर्स असोसिएशनची, फक्त गरजेपेक्षा अधिक कापसाची निर्यात योग्य असल्याचे जाहीर केले.

**प्रमुख कापूस निर्यातदार (९२-९३)**

| | |
|---|---|
| अमेरिका | १३.५० लाख टन |
| उझबेकिस्तान | ११.०० लाख टन |
| पाकिस्तान | ४.६८ लाख टन |
| भारत | ३.५४ लाख टन |
| तुर्कमेनिया | ३.५० लाख टन |
| ऑस्ट्रेलिया | ३.२९ लाख टन |
| चीन | २.०० लाख टन |
| सीरिया | १.५० लाख टन |

कापसाची गरज किती आणि उत्पादन किती, यांबबतचे अंदाज व आकडेवारी हा नेहमीचाच घोळ असतो. गिरण्या गरज फुगवतात, सरकारचे व व्यापाऱ्यांचे, कापसाच्या हंगामी उत्पादनाचे अंदाज सोयीनुसार असतात व प्रत्यक्ष काय घडते, याचा अंदाजच लागत नाही. कॉटन ॲडव्हायजरी बोर्ड, कॉटन कॉर्पोरेशन, ईस्ट इंडिया कॉटन ट्रेडर्स या प्रत्येकाचे अंदाज फार फरक दर्शवितात.१९९२-९३ हंगामात १३० ते १३२ लाखा गासड्या कापूस झाला. १९९३-९४ हंगामात १३४ ते १३६ लाख गासड्या उत्पादनाचे प्राथमिक अंदाज आहेत. प्रत्यक्षातील उत्पादन किती, याबाबत हंगामअखेरपर्यंत वाद चालतात.

भारतात भरपूर कापूस बनतो व गरज सरून निर्यात करूनही २५-३० लाख गासड्या शिल्लक राहतो, तेव्हा निर्यात योग्यच आहे, असे कापूस व्यापारी व शेतकऱ्यांना वाटते.

यंदा कापसाचे भाव वाढत चालल्याने मंत्रालयाने, नव्याने कोटा देण्याचे सोडाच; पण जाहीर झालेल्या कोट्यापैकी बाकी कोट्याची कंत्राटे न करण्याचे व त्यानंतर कोट्यानुसार केलेली कंत्राटे रद्द करून कापूस निर्यात थांबविण्याचे आदेश काढले. कापसाचे भाव वाढल्याने ही कारवाई करावी लागली, असे स्पष्टीकरण त्यासाठी देण्यात आले.

याचबरोबर पाच लाख गासड्या कापूस विनाआयातकर आयात करण्याचे ठरविले गेले.

निर्यातबंदी आणि आयात योजना जाहीर होऊनही, तसेच कापूस साठ्यांवर बंधने आणून, आवश्यक वस्तुसाठेबाजी दर्शवितात असे म्हणावे, तर ७० टक्के कापसू केंद्र-राज्य सरकारच्या संस्था खरीदतात! मग भाववाढ का व कशी होते? खरे कापसाचे गणित हे सरळ हिशेबात कधीच बसत नाही. उत्पादन, वापर, साठे, निर्यात सारी आकडेवारी बेभरवशाची असते.

(सकाळ, १५ मार्च १९९४ वरून साभार)

**भारत : कापसाचा ताळेबंद १९८०-८१ ते १९९२-९३** (लाख गासड्या)

| वर्ष | कापूस उत्पादन | आयात | अंतर्गत व्यापार | निर्यात |
|---|---|---|---|---|
| ८०-८१ | ७८.० | - | ८०.२० | ७.० |
| ८२-८३ | ८३.० | - | ७९.७० | ७.० |
| ८४-८५ | १०१.५ | १.० | ९१.२० | १.८ |
| ८६-८७ | ९५.० | - | १००.७० | १४.३ |
| ८७-८८ | ९०.० | ३.० | ९७.५० | ०.४ |
| ८८-८९ | १०६.० | २.३ | १०४.०० | १.० |
| ८९-९० | १३५.८ | - | १११.०० | १३.७ |
| ९०-९१ | ११७.० | - | ११५.५ | ११.९ |
| ९१-९२ | ११९.० | ३.० | १११.१ | ०.८ |
| ९२-९३ | १३०.० | ०.७ | १२०.० | १७.८ |
| ९३-९४ | (१३५) | (५) | १२०.० | ? |

# चंद्रपूर जिल्हा दारूदुकान नष्ट आंदोलन

चंद्रपूर जिल्हा शेतकरी संघटना व शेतकरी महिला आघाडीच्या वतीने सुरू असलेल्या दारू दुकानबंदी आंदोलनाने जोर पकडला आहे.

जिल्ह्यात दारूदुकानबंदीचे ठराव ३४ गावांतील ग्रामपंचायती / ग्रामसभांमध्ये झाले. त्यापैकी १० दुकाने जिल्हाधिकाऱ्यांनी ठरावांप्रमाणे बंद केली. ३ गावांतील पुढाऱ्यांनी कोर्टाकडे धाव घेतल्याने ती दुकाने जिल्हाधिकारी बंद करू शकले नाहीत.

१३ दुकानांच्या बाबतीतील निर्णय विचाराधीन आहेत. इतर ८ गावांतील ठरावासंबंधी वाद आहेत.

शेतकरी संघटना व शेतकरी महिला आघाडीने दारू दुकान बंदीचे ठराव होऊनही दुकाने बंद केली जात नसल्याने दि. ८ मार्च १९९४ रोजी एकाच वेळी चार ठिकाणी दारू दुकान नष्ट करण्याचे आंदोलन केले. वडोली (ता. गोंडपिपरी) येथे शेतकरी महिला आघाडी अध्यक्षा सौ. सरोज काशीकर, श्री. रवि काशीकर, सौ. रत्ना अस्वले; नांदाफाटा (ता. कोरपना) येथे शेतकरी संघटनेचे अध्यक्ष श्री. पाशा पटेल; कुठारे (ता. चंद्रपूर) येथे आ. डॉ. वसंतराव बोंडे, शेतकरी महिला आघाडीच्या माजी अध्यक्षा सौ. सुमनताई अग्रवाल तर विरूळ (स्टेशन) (ता. राजुरा) येथे आ. ॲड. वामनराव चटप, सौ. रेखा अपराजित यांच्या नेतृत्वाखाली त्या त्या भागातील स्त्रीपुरुष कार्यकर्त्यांनी दुकानांतील दारूच्या बाटल्या व इतर भांडी फोडून दारू नष्ट केली. नांदाफाटा येथे महाराष्ट्र शासनाच्या पोलिसांनी दारूदुकानांच्या रक्षणासाठी, शेतकरी महिला आघाडीच्या कार्यकर्त्यांवर लाठीमार केला त्यात जनाबाई मडावे, ललिता पेंदारे, देवराव लांडगे इत्यादी सहाजण जखमी झाले. विरूळ स्टेशन येथे पोलिसांनी आमदार चटप, सौ. वंदना चटप यांचे सह बऱ्याच कार्यकर्त्यांना अटक करून सत्याग्रहींवर जबरदस्त मानसिक दबाव आणण्याचा प्रयत्न केला. ●

# इंडियाचा नंबर निर्यातीत ३३ आणि आयातीत ३०

**निर्यात**

| देश | किंमत (दशलक्ष अमेरिकन डॉलर) | जागतिक निर्यातीच्या % |
|---|---|---|
| अमेरिका | ४४८.२ | १२.०१ |
| जर्मनी | ४३०.० | ११.५३ |
| जपान | ३३९.९ | ९.११ |
| फ्रान्स | २३५.८ | ६.३२ |
| इंग्लंड | १९०.० | ५.०९ |
| इटली | १७८.२ | ४.७८ |
| नेदरलँड्स् | १३९.९ | ३.७५ |
| कॅनडा | १३४.१ | ३.५९ |
| बेल्जियम | १२३.० | ३.३० |
| हाँगकाँग | ११९.५ | ३.२० |
| चीन | ८५.० | २.२८ |
| चिनी तैपेई | ८१.५ | २.१८ |
| द. कोरिया | ७६.६ | २.०५ |
| स्विझर्लंड | ६५.७ | १.७६ |
| स्पेन | ६४.३ | १.७२ |
| सिंगापूर | ६३.५ | १.७० |
| स्वीडन | ५६.१ | १.५० |
| सौदी अरेबिया | ४८.८ | १.३१ |
| मेक्सिको | ४६.२ | १.२४ |
| ऑस्ट्रिया | ४४.४ | १.१९ |
| ऑस्ट्रेलिया | ४२.५ | १.१४ |
| मलेशिया | ४०.६ | १.०९ |
| डेन्मार्क | ३९.६ | १.०६ |
| रशियन फेडरेशन | ३७.० | ०.९९ |
| ब्राझील | ३६.१ | ०.९७ |
| नॉर्वे | ३५.२ | ०.९४ |
| थायलंड | ३२.५ | ०.८७ |
| इंडोनेशिया | २९.३ | ०.७९ |
| आयर्लंड | २८.३ | ०.७६ |
| फिनलँड | २४.० | ०.६४ |
| द. आफ्रिका | २३.९ | ०.६४ |
| सं. अरब साम्राज्य | २१.६ | ०.५८ |
| इंडिया | १९.६ | ०.५३ |

**आयात**

| देश | किंमत (दशलक्ष अमेरिकन डॉलर) | जागतिक आयातीच्या % |
|---|---|---|
| अमेरिका | ५५३.९ | १४.३७ |
| जर्मनी | ४०८.६ | १०.६० |
| फ्रान्स | २३९.६ | ६.२२ |
| जपान | २३३.२ | ६.०५ |
| इंग्लंड | २२१.५ | ५.७५ |
| इटली | १८८.५ | ४.८९ |
| नेदरलँड्स् | १३३.८ | ३.४७ |
| कॅनडा | १२९.२ | ३.३५ |
| बेल्जियम | १२५.० | ३.२४ |
| हाँगकाँग | १२३.४ | ३.२० |
| स्पेन | ९९.८ | २.५९ |
| द. कोरिया | ८१.८ | २.१२ |
| चीन | ८०.६ | २.०९ |
| सिंगापूर | ७२.२ | १.८७ |
| चिनी तैपेई | ७२.० | १.८७ |
| स्विझर्लंड | ६५.७ | १.७० |
| मेक्सिको | ६२.१ | १.६१ |
| ऑस्ट्रिया | ५४.१ | १.४० |
| स्वीडन | ४९.९ | १.२९ |
| ऑस्ट्रेलिया | ४३.७ | १.१३ |
| थायलंड | ४०.७ | १.०६ |
| मलेशिया | ३९.७ | १.०४ |
| डेन्मार्क | ३३.७ | ०.८७ |
| सौदी अरेबिया | ३१.७ | ०.८२ |
| रशियन फेडरेशन | ३१.० | ०.८० |
| पोर्तुगाल | २९.६ | ०.७७ |
| इंडोनेशिया | २७.३ | ०.७१ |
| नॉर्वे | २५.९ | ०.६७ |
| इराण | २४.० | ०.६२ |
| इंडिया | २३.६ | ०.६१ |

**हे आहे नेहरू-अर्थव्यवस्थेचे प्रगतीपुस्तक**

**कौन बढाए देश की शान? भारत का आजाद किसान**

# या रे या, सारे या मिळुनी

*या मातीच्या, या धरणीच्या स्वातंत्र्याचे आम्ही सारथी*
*या रे या, सारे या मिळुनी होऊ या विकासाचे साथी ।।धृ.।।*

*दैनेत मी कर्ज बाजारी म्हणे राजा तरी संसारी*
*ऐसीच घडूनी ही दैना पुन्हा भाग्य माझे फरारी*
*चोरांची ही नगरी सारी आमच्या राशी त्यांची तीथी*
*या मातीच्या या धरणीच्या स्वांतंत्र्याचे आम्ही सारथी ।।१।।*

*अंतरीच्या नाना कळानी फासा इथे सारे फेकती*
*मालकी आम्हाला कष्टाची  राशी मात्र त्यांच्याच खाती*
*कां त्यांच्या पालख्या वाहतो पुन्हा आम्ही आमच्या माथी*
*या मातीच्या, या धरणीच्या स्वातंत्र्याने आम्ही सारथी ।।२।।*

*हो जागा आता श्रमधरा माजी कां फूकाच्या भाकऱ्या*
*दान कां देई तुझी शक्ती आता मुक्तीचा मार्ग करा*
*आता घेतू न्याय आपला श्रमीका आपुल्याच हाती*
*या मातीच्या, या धरणीच्या स्वातंत्र्याचे आम्ही सारथी ।।३।।*

*मोती पिकवू घामातूनी लावूया राशी शेतातूनी*
*नाही काही दान कुणाचे मोती मिळायाचे श्रमातुनी*
*साथ देई निसर्ग राजा हात द्या आता तुम्ही हाती*
*या मातीच्या, या धरणीच्या स्वातंत्र्याचे आम्ही सारथी ।।४।।*

***श्याम खांबेकर***

# भारतीय कापूसनिर्यात – चार हजार वर्षांची परंपरा

'भारतीय कापूस लॅटिन अमेरिकेत, कोलंबसने (इ. स. १४९२) भारताचा शोध लावण्याच्या किमान ४००० वर्षे आधीच पोहोचला होता.'

ही विस्मयजनक माहिती दिल्लीमध्ये ३ मार्च १९९४ रोजी 'जहाज बांधणी व सागरी वाहतूक' या विषयी भरलेल्या आंतरराष्ट्रीय विज्ञान सभेत देण्यात आली.

इसवी सन पूर्व सुमारे २५०० वर्षापासून अमेरिकेत संकरित वाणाच्या कापसाचे उत्पादन घेतले जाते. हे संकरित वाण भारतातील जुने वाण व अमेरिकेतील स्थानिक वाण यांपासून तयार झालेले असल्यामुळे भारतीय कापूस त्या काळात अमेरिकेत पोहोचला असला पाहिजे. भारतातील जहाजबांधणी तंत्र व सांगरी वाहतूक यंत्रणा इतक्या पुरातन काळातही इतकी ताकदवान होती की महासागरे ओलांडून भारतीय कापूस तेथे पोहोचला असावा असा दावा इतिहासतज्ज्ञ डॉ. लोतिका वरदराजन यांनी केला आहे.

(आधार : इकॉनॉमिक टाईम्स्, ४ मार्च १९९४)

# लुटारू अधिकाऱ्याची धिंड

नांदेड जिल्ह्यातील भोकर, किनगाव व हदगाव तालुक्याचे वसुली अधिकारी सोसायटीच्या थकित कर्जाच्या वसुलीच्या नावाने गावोगाव शेतकऱ्यांच्या घरी जप्ती घालून घरातील धान्य, भांडीकुंडी व इतर वापरावयाच्या वस्तू घेऊन जाऊ लागले. नांदेड जिल्ह्याच्या नाना पाटील ब्रिगेडने या अधिकाऱ्यांना, शेतकऱ्यांच्या संसारोपयोगी वस्तू व धान्य जप्त करणे हे कायद्याबाहेर असून अशा तऱ्हेने जप्ती करणे हा लुटारूपणा आहे असे सांगून, त्यांनी आपला हा लुटारूपणा त्वरीत थांबवावा अन्यथा कारवाई करण्यात येईल असा इशारा दिला. सोसायटीच्या कर्जवसुलीसाठी जमिनीच्या लिलावाचा मार्ग कायद्याने ठेवलेला असतांनासुद्धा सदर वसुली अधिकाऱ्याने आपला लुटारूपणा सोडला नाही. नाना पाटील ब्रिगेडने दिलेली १५ दिवसांची मुदत संपली.

आणि भोकर तालुक्यातील लामकानी येथे एका शेतकऱ्याच्या घरी वसुलीच्या नावाने लुटालूट करावयास या अधिकाऱ्यास नाना पाटील ब्रिगेडच्या सैनिकांनी रंगेहाथ पकडले आणि त्याच्या गळ्यात खेटरांची माळ घालून त्याची गावातून डबडी बडवीत गाढवावरून धिंड काढली. यापुढेही, जर या अधिकाऱ्याने आपला लुटारूपणा सोडला नाही तर याहून कडक कारवाई करण्यात येईल असा इशाराही नाना पाटील ब्रिगेडने दिला आहे.

*(संघटक प्रतिनिधी)*

## खुल्या व्यवस्थेचे खरे साथी

**प्रयोगशील शेतकरी**
**उद्योजक शेतकरी**
**व्यापारी शेतकरी**
**निर्यातदार शेतकरी**

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On 21st March, 1994
To

**SHETKARI SANGHATAK**
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926/83
March 21, 1994

**PNCW 281**
Licence to post without prepayment
**No. 87**

# कर्जमाफीची घोषणा

## मुख्यमंत्र्यांचा शेतकऱ्यांविरुद्ध डाव

पुन्हा एकदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. शरद पवार यांनी शेतकऱ्यांना सरकारी कर्जाची माफी देण्याची घोषणा करून बिगर-शेतकऱ्यांमध्ये शेतकरीविरुद्ध भावना निर्माण करण्याचा डाव टाकला आहे.

माफीची घोषणा करतांना फक्त माफ करावयाच्या एकूण रकमेचा मोठा आकडा जाहीर केला जातो. त्यामुळे, आठ दिवसांच्या भाड्यामध्ये महिनाभर रेल्वेने प्रवास करण्याची सुविधा मिळविणारा नागरिकसुद्धा शेतकऱ्यांना सरकारने खूप काही दिले असे म्हणायला लागतो. सगळेच नोकरदार सरकारने शेतकऱ्यांना लाडावून ठेवले आहे असं म्हणून तावातावाने चर्चा करायला लागतात.

पण सरकारने जाहीर केलेल्या माफीच्या एकूण रकमेला या माफीच्या लाभधारक शेतकऱ्यांच्या संख्येने भागले तर प्रत्येकी येणारी माफी ही अत्यल्प असते. शेतीमालाला मिळणारा भाव रास्त नसूनही यापेक्षाही जास्त किंमतीचे पीक उंदीरघुशी इत्यादी प्राणी दर हंगामाला फस्त करीतच असतात. पण, या हिशोबाकडे लक्ष देण्यासाठी कोणाला फुरसत नसते आणि गरज तर अजिबात नसते. त्यांना 'माफी' च्या उद्‌गात्याने शेतकऱ्यांच्या नावाने करायला एक 'शंख' बहाल केलेला असतो. त्या नादात ते, शेतकऱ्यांबद्दल मनात अढी पक्की करतातच आणि त्याचबरोबर आजूबाजूला घडणाऱ्या इतर घटनांबद्दल बेफिकीर बनतात.

१९८९ साली केंद्रशासनाने केलेल्या दहा हजार रुपयांच्या कर्जमाफीने लाभधारक शेतकऱ्यांना सरासरी अडीच ते तीन हजारांचीच सूट मिळाली पण अजूनही समग्र शेतकरी समाजाला शिव्या खाव्यात लागत आहेत प्रत्येकी दहा हजाराच्या!

खरोखरी शासनाला शेतकऱ्यांना त्यांचा फारसा संबंध नसलेल्या या बोजातून मोकळे करायचे होते तर तसे प्रत्येकाला एक साधे पत्र आणि त्याची प्रत संबंधित महसूल अधिकाऱ्याला पाठवून तसे करता आले असते.

पण, विद्यमान मुख्यमंत्र्यांनी पुन्हा एकदा माफीची घोषणा करून देशाच्या अर्थव्यवस्थेच्या अग्रभागी येत असलेल्या शेतकऱ्याबद्दल इतरेजनांचे मत कलुषित व्हावे म्हणूनच वाजत गाजत केली असावी.

**बाबुराव मगदूम,** हेर्ले, जि. कोल्हापूर.

---

## साखरेच्या आयातीला परवानगी

देशात साखरेचा साठ पुरेसा उपलब्ध व्हावा व खुल्या बाजारातील किमतीवर नियंत्रण राखण्याच्या उद्देशाने खुल्या परवान्याखाली साखरेची आयात करण्यास परवानगी देण्याचा निर्णय केंद्र सरकारने आज जाहीर केला.

या साखरेच्या आयातीवर कोणतेही सीमाशुल्क आकारले जाणार नाही, असे अन्नखात्याचे राज्यमंत्री कल्पनाथ राय यांनी लोकसभेत सांगितले.

●

## स्त्रियांवर भारतात आज

| | |
|---|---|
| दर ५४ मिनिटांनी | १ बलात्कार |
| दर २६ मिनिटांनी | १ अतिप्रसंग |
| दर ४३ मिनिटांनी | १ अपहरण |
| दर ५१ मिनिटांनी | १ विनयभंग |
| दर १०२ मिनिटांनी | १ हुंडाबळी |
| दर ३३ मिनिटांनी | १ क्रूरकर्म |
| दर ७ मिनिटांनी | १ गुन्हेगारी हल्ला |

घडत आहेत.

१९८५-९१ या पाच वर्षांत भारतातील बलात्कार व अतिप्रसंगांची प्रकरणे २६ टक्क्यांनी तर हुंडाबळीच्या घटना १७० टक्क्यांनी वाढल्या आहेत.

*(इंडियन एक्स्प्रेस, १६-३-९४ वरून)*

## बळीराज्य आंदोलन विशेषांक

'शेतकरी संघटक' चा बळीराज्य आंदोलन विशेषांक २१ मार्च १९९४ रोजी प्रकाशित करण्याचे जाहीर केले होते. परंतु, आंदोलनाच्या बातम्यांचे संकलन पुरेसे न झाल्याने हा अंक आता ६ एप्रिल १९९४ रोजी प्रकाशित करण्यात येईल. 'शेतकरी संघटक' च्या वाचकांनी दिरंगाईबद्दल क्षमा करावी ही विनंती.

– संपादक

**६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.**
**प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहाराचा पत्ता**
**अंगारमळा, मु. पो. आंबेठाण (४१० ५०१)**
**ता. खेड, जि. पुणे.**

**संपादक, मुद्रक, प्रकाशक**
**सुरेशचंद्र म्हात्रे**
**फोन : द्वारा - चाकण ५२३५४/५२४६८**
**एस्.टी.डी.- ०२१३५**

**पाक्षिक शेतकरी संघटक**
**मालक – मोहन बिहारीलाल परदेशी**
**मुद्रण स्थळ – गणेश प्रिंटर्स,**
**६९३, बुधवार पेठ, पुणे - २.**